प्रकरण चौथे

# 'गोदू गोखले' मधील स्त्री दर्शन

## प्रकरण चौथे

# 'गोदू गोखले' मधील स्त्री दर्शन

मामा वरेरकरांनी कादंबरी लेखनास सुरूवात केली त्याच्या अगोदर व नंतरही अनेक लेखकांनी आपल्या कादंबऱ्यामधून सामाजिक प्रश्न मांडले. तसेच मामा वरेरकरांनीही आपल्या अनेक कादंबऱ्यामधून सामाजिक प्रश्न मांडले. त्यापैकी त्यांनी लिहलेल्या 'गोदू गोखले' (१९३२—३३) हया सामाजिक कादंबरीचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. तत्कालीन समाजाची अभिरूची लक्षात घेता ही कादंबरी अनेक बाबतीत अभूतपूर्वच मानली पाहिजे.

'गोदू गोखले' कादंबरीची नायिका गोदू हिच्या व्यक्ति— विकासाकरता मामा वरेरकरांनी पात्रमुखी कादंबरी प्रकाराचा अवलंब केला. त्यामुळे विषय मांडणी करणे सोयीचे झाले. आणि कथानकात परिणामकारकता व जिव्हाळा साधता आला. 'गोदू गोखले' हया कादंबरीमधील नायिका गोदू हिच्या व्यक्तिचित्रणाचे कौशल्य मामा वरेरकरांनी दाखविले आहे. स्त्रीजीवनपर कथानकातून तटस्थपणा व अलिप्तपणा राहू नये म्हणून 'गोदू गोखले' कादंबरीची नायिका गोदू ही आपले जीवनचरित्र सांगते हा सत्याभास मामा वरेरकरांनी साधला आहे. 'गोदू गोखले' ही कादंबरी आत्मवृत्तपर असल्यामुळे कादंबरीची नायिका गोदूच्या व्यक्तिविकासाचे विविध पैलू मांडलेले आहेत. तसेच स्त्रीजीवनातील लहान—मोठया समस्या मामा वरेरकर यांनी यशस्वीपणे हाताळल्या आहेत. त्यामुळेच परंपरेच्या गर्तेत व कायद्याच्या चौकटीत अडकलेल्या महाराष्ट्रीय स्त्रियांची मूक दु:खे वेशीवर टांगता आली.

स्त्रियांच्या हक्काचा आग्रही प्रचार व पुरस्कार करण्याकरितांचा मामा वरेरकरांनी गोदूची पात्र निर्मिती केलेली आहे. 'गोदू गोखले'

कादंबरीत असणारे क्रांतिकारकत्व शब्दाशब्दातून दिसून येते. वरेरकर यांच्या सर्व नायिका प्रमाणे 'गोदू गोखले' या कादंबरीची नायिका गोदूही तेजस्वी, बाणेदार, करारी व निर्भय आहे.पात्रांच्या नावापासून ते त्यांच्या मानसिक स्थितीचे चित्रण करेपर्यंत वरेरकरांच्या ठिकाणी असणारी वास्तवता [illegible] दिसून येते.

'गोदू गोखले' कादंबरीची नायिका गोदू ही एका मामलेदाराची मुलगी आहे. त्यामुळे लहानपणापासूनच लाडावलेली असल्यामुळे कोणाशी काय, कसे, बोलायचे याचे भान गोदूला राहत नसे. त्यामुळे गोदू लहान–मोठया सर्वांचाच अपमान करीत होती. रत्नागिरीला असताना गोदू शाळेत जाते तेव्हा तिची ओळख ठकू नावाच्या मुलीशी होते. आणि एके दिवशी गोदू ठकीच्या वडिलांच्या घाण्यावर जाते. आणि ठकीने प्रेमाने दिलेली खोबऱ्याची पेंड खाते. गणू पट्टेवाला ही बातमी गोदूच्या आईला सांगतो. म्हणून गोदू गणूच्या थोबाडीत मारते. याचा गोदूच्या आईला राग येतो. आणि गोदूची आई गोदूला मारते. त्याच रात्री गोदू आजारी पडते.

गोदू बरी झाल्यानंतर शाळेत जाऊ लागते. तेव्हा यमू आणि बनी यांच्याशी गोदूची मैत्री होते. गोदूला शाळेत मास्तरासह सर्वजण 'गोदूताई' या नावाने बोलावत होते. पण सर्वांनी आपणास 'गोदू' म्हणावे असे गोदूला वाटत होते.

गोदूच्या मनामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता. गोदूला प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची सवय होती. गोदू बंडखोर, चिकित्सक स्वभावाची होती. म्हणूनच एके दिवशी बनीच्या वडिलांच्या दुकानात जाऊन त्यांची खोड मोडायचे ठरवते. व तेथे जाऊन त्यांच्याच दुकानातील पेपरमिंटच्या गोळया सर्वांना फुकट वाटते व त्याची खोड मोडते. तर गणू पटट्वाल्याच्या घरी जाऊन दूध पिते आणि सुके बोंबील पाहते. गोदू वारंवार आपल्या

मैत्रिणीच्या घरी जात होती. त्यामुळे गोदूची आपल्या मैत्रिणीशी घट्ट् मैत्री होते.

कालांतराने गोदूच्या वडिलांची रत्नागिरीला बदली होते. गोदू सर्वांना सोडून जाणार म्हणून शाळेत गोदूसाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजीत केला जातो. प्रत्येकजण आपआपल्या भाषणामध्ये गोदूची स्तुती करतात. गोदूच्या विरहाची कल्पनाच गोदूच्या मैत्रिणी ठकी, बनी, यमू यांना सहन न झाल्यामुळे त्या रडू लागतात. तेव्हाच गोदूच्या दादाचे मित्र ही त्याला भेटण्यासाठी घरी येतात. सर्व मुले हसत—खिदळत असलेले पाहून गोदू आईला विचारते मी जाणार म्हणून माझ्या सर्व मैत्रिणी रडतात आणि ही मुले हसतात. हया मुलांना मित्र जाणार म्हणून वाईट वाटत नाही काय? तेव्हा गोदूची आई म्हणते, हाच बायकाच्यांत व पुरूषांमध्ये फरक आहे.

गोदू रत्नागिरीला गेल्यानंतर गोदूचा प्रथम परिचय बाबीशेट या व्यक्तीशी होतो. गोदूच्या घराशेजारी डॉ. कीर्तिकर नावाचे गृहस्थ राहत होते. ते प्रार्थनासमाजनिष्ठ होते. त्यांचा व बाबीशेट यांच्या विचारांचा प्रभाव गोदूवर पडतो. रत्नागिरीला असताना गोदूची छबी व कमा नावाच्या मुलीशी मैत्री होते. कमा वयाने मोठी असल्यामुळे तिचे लग्न लवकर होणार हे निश्चित होते. तर घरच्या परिस्थितीमुळे छबीला आपले शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागते.

गोदू फारशी अभ्यासू नव्हती. तरीही गोदूचा वर्गात नेहमी पहिला नंबर येत होता. हे पाहून वर्गातील इतर मुलांना गोदू मुलगी असल्यामुळे मास्तर तिला जास्त मार्क देतात असा मुलांचा समज होता. गोदू रत्नागिरीला असताना गोदूची व बनीची अचानक भेट होते. बनीला पाहून गोदूला आश्चर्य वाटते. लग्नानंतर मुलीच्यामध्ये किती बदल होतो. याचा गोदूला प्रत्यय येतो. बनी

आपल्या सासरच्या लोकांविषयी गोदू व तिच्या आईला सांगते. बनी व गोदूच्या गप्पामध्ये ठकीचे नाव निघते. ठकीचे नाव निघताच बनी सांगते की ठकीचे लग्न तिच्या मनाविरूध्द झाले होते.

गोदूचे शालेय शिक्षण पूर्ण होऊन गोदूला जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळते. गोदू महाविद्यालयात जाण्यासाठी निघण्याअगोदर डॉ. कीर्तिकारांना भेटायला जाते. तेव्हा डॉ. कीर्तिकर गोदूला भावपूर्ण अंत:करणाने निरोप देतात. तर बाबीशेट यांना आपल्या काळजाचा तुकडा दूर जातो आहे असे वाटते.

गोदू मुंबईला हॉस्टेलमध्ये राहते. तेथे गोदूची ओळख मंजुळा नावाच्या मुलीशी होते. ती जातीने मराठा असते. तर इतर बऱ्याच मुली हया ब्राहमण जातीच्या असतात. त्यामुळे तेथे जातिभेद पाळला जात असे. जेवणाच्या पंक्तीच्या वेळी ब्राहमण मुली एकिकडे व इतर जातीच्या मुली एकीकडे बसत असत. हे पाहून गोदूला राग येतो. मंजुळा व गोदूचे विचार एक असल्यामुळे दोघींची मैत्री होते. गोदूच्या वागण्याविषयी सर्व कॉलेजात चर्चा सुरू होते. तेव्हा नाना नावाचा मुलगा गोदूची खोड मोडायची म्हणून गोदूशी जवळीक साधतो. परंतु गोदू त्याला प्रतिसाद देत नाही. कॉलेजात शिकणाऱ्या मुलाच्या मध्ये गोदू वयाने सर्वात लहान होती. त्यामुळे गोदू काहीही बोलली तरी गोदूला उर्मट समजले जात होते. छबीचे लग्नाविषयी मत ऐकल्यानंतर गोदूचा लग्नविधी विषयी तिटकारा वाटतो. रत्नागिरीला असताना नाना गोदूची चौकशी करतो. नाना गोदूची नेहमीच स्तुती करू लागतो. याच दरम्यान गोदूची मैत्रीण गौरी गोदूला तिच्या सौंदर्याची जाणीव करून देते. त्यामुळे गोदूपुढे नवी सृष्टी उभी राहते. नानाने लिहलेल्या कवितेवरून गोदू व नाना विषयी कॉलेजात चर्चा सुरू होते. दोघांची नावे बाकावर लिहली जातात. याचा गोदूला राग येतो. गोदू विषयी नानाला वाटणारे प्रेम

नाना प्रकट करतो. पण गोदू नानाला प्रतिसाद देत नाही. म्हणून नाना गोदूच्या लग्नाविषयी बाहेरून विचारपूस करू लागतो.

सुट्टीत गोदू रत्नागिरीला जाते. गोदू पुढे शिकते याचा बनीला आनंद होतो. पण आपले लग्न लवकर झाल्यामुळे आपणांस पुढे शिकता आले नाही याचे बनीला वाईट वाटते. छबीचे लग्नाविषयी मत ऐकल्यानंतर गोदूचा लग्नविधी विषयी तिटकारा वाढतो. गोदूची आई एकाएकी आजारी पडते. नानाने गोदूशी लग्न करावे असे गोदूची आई नानाकडून वचन घेते. पण गोदू आईची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी नव्हे, तर लग्नाचा अनुभव घ्यावा म्हणून नानाशी लग्न करते. दोघांचा संसार सुरू होतो. बाळंतपणासाठी गोदूला दवाखान्यात दाखल केले जाते. तेव्हा नाना गोदूचे 'गोदू चितळे' असे नाव लावतो. त्याच दवाखान्यामध्ये बनी नर्स म्हणून काम करत असते. गोदू व बनीची भेट झाल्यानंतर बनी गोदूला तुझे नाव गोदू चितळे असे नाव दाखल केले आहे असे सांगते. आपले नाव बदलले हे ऐकून गोदूला खूप राग येतो. याच कारणामुळे गोदू व नानामध्ये जोराचे भांडण होते. गोदू दवाखान्यामध्ये असतानाच गोदू, बनी व ठकीची भेट होते. बनी व ठकीचे वैवाहिक जीवन सुखाचे होत नाही. हे ऐकून गोदूला फार वाईट वाटते.

नाना बरोबर राहणे त्याने कमवलेल्या पैशावर जगणे हे गोदूला असहय होऊ लागले. एकाने कमवायचे व दुसऱ्याने बसून खायचे हे गोदूला पटत नव्हते. शब्दाने शब्द वाढत जाऊन नाना व गोदूमध्ये भांडणे होऊ लागतात. गोदू नोकरी करण्याचा निर्णय घेते. पण गोदूचा निर्णय नानाला मान्य होत नाही. गोदूने नोकरी केली तर ती आपल्या प्रॅक्टीसच्या आड येईल असे नानाला वाटते म्हणूनच 'गोदू' नानाची खोड मोडण्यासाठी वकिलीची सनद मिळवते. व कोर्टामध्ये नानाला शह देते. गोदूचे हे वागते नानाला अपमानास्पद

वाटते. म्हणून नाना दुसऱ्या गावी जाऊन पुन्हा नव्याने प्रॅक्टीस सुरू करतो.

कम्युनिझमची विचारप्रणाली सोडून गोदू १९३० मध्ये सुरू असलेल्या देशव्यापी आंदोलनात सक्रीय सहभाग घेते. या दरम्यान पिकेटिंग करणाऱ्या सेविकांना पकडले जाते. त्यामध्ये गोदूलाही शिक्षा होते. तरूंगामध्ये करमत नाही म्हणून गोदू स्वत:चे आत्मचरित्र लिहते.

[illegible] कादंबरीची [illegible] असामान्य अशी [illegible] गोदू चिपळूण तालुक्यातील मामलेदाराची मुलगी होती. तालुक्याच्या ठिकाणी मामलेदाराचा दराराही मोठा होता. म्हणूनच गावातील व्यापारी, प्रतिष्ठित वकील, नोकरवर्ग, मामलेदाराचा आपआपल्या घरी मान राखीत होते. अशा संपन्न व वजनदार मामलेदाराची मुलगी 'गोदू' 'लाडाचं कोडं शेजाऱ्याची खाई हाडं' या उक्तीनुसार शेफारली नाही तरच नवल. गोदूचा व तिच्या वडिलांचा फारसा सलोखा नव्हता. पण आईशी अधिक जवळीक होती. त्यामुळे गोदू हट्टी बनली. याच गोदूच्या हट्टी स्वभावात आईचा अलिप्तपणा, बाबांचे दुर्लक्ष आणि दादाचा परकेपणा या गोष्टीची भर पडली. त्यामुळेच गोदू शक्य तेवढे करून दुसऱ्याला त्रास कसा द्यावा आणि सताऊन कसे सोडावे यात तरबेज बनली. लहान मोठा हा भेदच जणू गोदू विसरून गेली होती. दादाला लोकांनी शेळपट म्हणावे व आपली मनसोक्त स्तुती करावी असे गोदूला वाटत होते. त्यामुळे कोणाला काय, केव्हा, कुठे बोलावे याचा विचारच गोदू करीत नसे. लहानपणापासून गोदूला वाचनाचा नाद असल्यामुळे शब्दांचे भांडार गोदू जवळ होते. याचे गोदूच्या बाबांना कौतुक वाटत होते. त्यामुळे गोदू कोणताही विषय निघाला तरी आपले मत मांडीत असे, याचे सर्वजण कौतुक करीत होते. यामुळे 'मी कुणीतरी आहे.' असे गोदूला वाटे. आई वडील एवढेच

नव्हे तर मास्तर देखील गोदूला 'ताईसाहेब' म्हणत होते. पण गोदूला मात्र सर्वांनीच आपणांस 'गोदू का म्हणू नये?' असा प्रश्न पडे.

गोदू आजारी पडल्यामुळे वर्गात तिचा तिसरा नंबर येतो. त्यामुळे गोदूला ठकू नागू तेली हिच्याशी मैत्री करण्याची संधी मिळते. ठकीच्या तोंडून गोदूने ढवळया बैलाच्या गोष्टी ऐकल्या होत्या. माणसे जनावरांवर एवढे प्रेम करतात. पण माणसामाणसात एवढे प्रेम का असू नये? असा गोदूच्या मनाला स्वाभाविकच प्रश्न पडतो. ठकी ही एका मुक्या प्राण्यावर जर एवढे प्रेम करते तर आपण व दादा सख्खी भांवडं, पाठीला पाठ लावून आलेली, मग आपल्यात व दादामध्ये ही दिसून येणारी परकेपणाची भावना का? आपले आणि दादाचे जिव्हाळयाचे संबंध का असू नयेत? या गोष्टीचा गोदू विचार करते. गोदू एके दिवशी ठकीच्या वडिलांच्या घाण्यावर जाते. ताईसाहेब आल्यात म्हणून ठकीचा आनंद गगणात मावेनासा होतो. ताईसाहेबांना काय द्यावे आणि काय देऊ नये? असा ठकीला प्रश्न पडतो. ठकीचे भारावून जाणे गोदूच्या लक्षात येते. तिथल्या वात्सल्याच्या देखाव्याने गोदूचे अंत:करण वेडावून जाते. आणि ठकीच्या या निरतिशय प्रेमाने गोदू चिंब भिजून जाते. कधीही न बघितलेली व एरवी कोणी दिली असती तर खोबऱ्याची पेंड गोदूने खाल्ली नसती. पण ठकीने प्रेमाने दिलेली खोबऱ्याची पेंड गोदू खाते ज्याप्रमाणे श्रीकृष्ण सुदाम्याचे पोहे आनंदाने खातो. त्याप्रमाणे गोदूही ठकीने दिलेला खाऊ आनंदाने खाते.

गणू पट्टेवाला ही बातमी गोदूच्या आईला सांगतो. याचा गोदूला राग येतो. आणि रागाच्या भरात गोदू गणू पट्टेवाल्यांच्या थोबाडीत मारते. याचा गोदूच्या आईला राग येऊन गोदूची आई गोदूला मारते. त्या रात्री गोदूला खूप ताप येतो. डॉक्टराचे उपचार ही काम करत नाहीत. तेव्हा गणू पट्टेवाला गोदूच्या वडिलांच्या मर्जीविरूध्द एका वैद्यबुवांना घेऊन येतो. गोदू तापामध्ये

मी कोकणची आहे असे चावळते. यावरून गोदूला कोकणाविषयी असणारे प्रेम दिसून येते. आजारातून बरी झाल्यानंतर गोदू शाळेत जाते. गोदूला घरी मार बसल्याची बातमी त्याच्याच वर्गात असणारी बनी गोडबोले नावाची मुलगी ठकीला सांगते. आपणामुळे गोदूला मार बसला याचे ठकीला वाईट वाटते. गोदू शाळेत येताच सर्वजण गोदूला 'ताईसाहेब' या नावाने हाक मारतात. इतर मुलींना बनीसाहेब, ठकूसाहेब, यमूसाहेब अशी हाक मारत नाहीत, मग मीच तेवढी ताईसाहेब का? म्हणून गोदू मास्तरांना म्हणते — "तेल्याची मुलगी असली म्हणजे काय नटकी असते, की पंचवीस रूपयेवाल्या कारकुनाची मुलगी आंधळी, असते? कुणाला ठाऊक कदाचित आमच्या बाबांचे वडिल पंचवीस रूपयेवाले कारकून नव्हते हे कशावरून?"[१] असे म्हणताच वर्गातील सर्व मुले हसतात. याचा मास्तरांना राग येतो. 'गोदू गोखले' मागे बस असे मास्तर गोदूला म्हणतात. गोदू मास्तरांना आजच बसू का? असा उलट प्रश्न करते. तर मागील बाकावर बसलेली एक मुलगी 'ताईसाहेब' म्हणा 'ताईसाहेब' असे म्हणते. याचा मास्तरांना राग येऊन मास्तर मुलीला उलटे टांगण्याची धमकी देतात. गोदू मास्तरांना उलटून बोलते याचे वर्गातील सर्व मुली समर्थन करतात. पण ठकू गंभीर होऊन म्हणते. "असं म्हणू नये यमे, किती झालं तरी ते आपले मास्तर आहेत — गुरूजी आहेत. वडील माणसांना उलटून उत्तर देऊ नये,"[२] याचा यमूला राग येतो. गोदूनं काहीही म्हटले तरी चालते, कारण ती मामलेदाराची मुलगी, शिवाय तुमच्या घाण्यावर आल्यामुळे गोदू तुझी मैत्रीण झाली. एक दिवस तरी गोदूला आमच्या दुकानी घेऊन जाईन तुमच्या सारखे "आमच्या दुकानी खोबऱ्याची पेंड ही नाही आणि सुके बोंबिल ही नाहीत!" [३] असे यमू म्हणते.

यमूचे वडील व्यापारी, पक्के कंजुस, चिडके, संतापी व रागीट स्वभावाचे होते. त्यांच्या दुकानात येणाऱ्या प्रत्येक

गिऱ्हाकाला ते फसवित होते. त्याची ही खोड मोडण्यासाठी गोदू एक दिवस यमूच्या वडिलांच्या दुकानात जाते. मामलेदाराची मुलगी आपल्या मुलीची मैत्रिण आहे. म्हणून यमूचे वडील गोदूला खाण्यासाठी पेपरमिंटच्या गोळया देतात. पण गोदू एकटी गोळया न खाता सर्वांनाच फुक्कट गोळया वाटून यमूच्या वडिलांची खोड माडते.

आपले अज्ञान कोणापुढे उघडे पडू नये म्हणून माहित नसलेली प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची गोदूची जिज्ञासू वृत्ती होती. गोदू एका ब्राह्मण कुटुंबातील मुलगी असल्यामुळे तिने सुके बोंबील हा शब्द कधीही आपल्या घरात ऐकलेला नसतो, बघणे तर दूरच, याशिवाय गोदू आजारी असताना गणूने जे गोदूसाठी केले हया जाणिवेपोटीच गोदू गणू पट्टेवाल्याच्या घरी जाते. गणूने बसण्यासाठी खुर्ची घेऊन येण्याअगोदरच गोदू खाली घोंगडयावर बसते. यातूनच गोदूच्या मनाचा मोठपणा दिसून येतो. गोदू गणूला सुके बोंबील पहाण्यासाठी आले आहे असे सांगताच गणू व त्याची बायको सुभद्रा दोघेही आश्चर्य चकित होऊन एकमेकांकडे पाहतात. गोदूच्या हट्टी स्वभावामुळे गणू गोदूला सुके बोंबील दाखवतो. ते पाहून गरिबांच्या घरी घाणीला वास म्हणतात का? असा प्रश्न गोदूला पडतो. गोदू गणूच्या बायकोची ओळख करून घेते. ओळखीनंतर गोदू गणूच्या बायकोला 'सुभद्रा' या तिच्या खऱ्या नावाऐवजी 'सुभद्राबाई' या नावाने बोलावते. पण गणूची बायको आपणांस 'सुभद्राबाई' न म्हणता फक्त 'सुभद्रा' या नावाने बोलवा असे सांगते. गणूच्या बायकोच्या मते 'बाई' हे विशेषण फक्त ब्राह्मणांच्या बायकांना लावतात. ब्राह्मणांच्या बायकांना बाई का म्हणायचे? आणि कुणब्यांच्या बायकांना नुसत्या नावानेच का हाक मारायची? ब्राह्मणांच्या बायका नावापुढे बाई लावतात, पुरूष राव, पंत लावतात असे का? हा भेदाभेद का? कसा? व केव्हा उत्पन्न झाला.

एकाच धर्मातील वेगवेगळया जातीव्यवस्थेत अशी विभागणी का असावी? एकाच धर्मात आचार व विचार प्रणालीत अशी भिन्नता का आढळावी? असे अनेक प्रश्न गोदूला पडतात.

गोदू घरी येते. गणू गोदूच्या आईला गोदूताई आज आपल्या घरी आल्याचे सांगतो. पण आपण गोदूताईना दुधाखेरीज दुसरे काहीही दिले नाही असे सांगतो. हे ऐकून गोदूची आई हसते. तिथे काय पाहिलेस असे गोदूची आई गोदूला विचारताच तेथे आपण सुके बोंबील पाहिल्याचे गोदू आईला सांगते.

गोदू लहानपणापासून चौकस असल्यामुळे सामान्य मुलींना सुचणार नाहीत असे प्रश्न गोदू विचारते. गोदू आपल्या वडिलांच्या कचेरीतील गोडबोले कारकुनाच्या घरी जाते. त्याची मुलगी बनी ही गोदूची मैत्रीण होती. गोदूला पाहताच गोडबोले म्हणाले 'ताईसाहेब' यावेळी इकडे कुणीकडे, तेव्हा गोदू कुत्सित स्वरात बोलते, तुमची पाटाची बायको पहायला आले होते. गोदूचे बोलणे गोडबोल्यांना जिव्हारी झोंबणारे होते. माईसाहेबांचा म्हणजेच गोडबोल्यांच्या व्दितीय कुटुंबाचा गोदूने पाटाची बायको असा उल्लेख केल्यामुळे त्या फणकारल्या हे पाहून गोदूच्या मनात सारखे विचार येत होते. गणू पटट्वाल्याच्या बायकोला पाटाची बायको म्हटले तर राग येत नाही. पण गोडबोल्यांना 'पाटाचा नवरा' म्हटले त्यांत वास्तविक चुकलं कुठं? एक नवरा मरून दुसऱ्या नवऱ्याशी लग्न लावणाऱ्या शूद्राच्या बायकोला 'पाटाची बायको' कां म्हणतात, आणि एक बायको मरून दुसऱ्या बायकोशी लग्न लावणाऱ्या ब्राहमणाला 'पाटाचा नवरा' का म्हणू नये? ब्राहमणाला 'पाटाचा नवरा' का म्हणू नये? ब्राहमणासाठी एक नियम का? आणि शुद्रांसाठी दुसरा नियम का? मुळी ब्राहमण आणि शूद्र हाच भेद का उत्पन्न झाला? समाजाच्या विचासरणीत काही तरी दोष आहे असे गोदूला वाटते.

गोदूच्या वडिलांची रत्नागिरीला बदली होते. शाळेमध्ये गोदूच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. प्रत्येकजण आपणाला सुचेल तसे भाषण करतात. यामध्ये ठकी, बनी आणि यमू प्रामुख्याने भाग घेतात. बनी गोडबोले आपल्या भाषणामध्ये गोदूचे कौतुक करते. तर ठकू तेली आपल्या भाषणामध्ये गोदूची व आपली कशी ओळख झाली. आपण तेलाच्या घाण्यावर कशा गेलो, गोदू आजारी पडल्यानंतर गणू पट्टेवाल्याने गोदूला कशी मदत केली. यमूच्या वडिलांच्या दुकानात गेल्यानंतर काय काय घडले हे सर्व ठकी आपल्या भाषणात सांगते. त्यामुळे तिच्या भाषणात घरगुतीपणा व आपलेपणा निर्माण झालेला दिसून येतो.

गोदू आपल्या भाषणांमध्ये ठकी, बनी व यमूविषयी आपणास वाटणारे प्रेम प्रकट करते. विशेषत: ठकीमुळेच इतर मुलीशी जवळीक साधता आली. व आपल्या जीवनाला नवी दृष्टी मिळाली. त्यामुळे चिपळूण व तेथे झालेल्या मैत्रिणींना आपण केव्हाही विसरणार नाही असे गोदू आपल्या भाषणात सांगते. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.' या म्हणीनुसार गोदू पुढे मोठी वक्ती होऊन वर्तमान पत्रातून नाव गाजवेल असे गोदूच्या मास्तरांना वाटते. हे ऐकून गोदूच्या डोळयात आनंदाश्रू येतात. ठकी, बनी आणि यमू याही रडू लागतात. निरोप समारंभ झाल्यानंतर ठकी, यमू आणि बनी गोदूला घरापर्यंत सोडायला जातात. तेव्हा तिघीनांही आपले अश्रू अवरता येईनात तेव्हा गोदूची आई त्यांची समजूत काढते. त्याचवेळी गोदूच्या दादाचे मित्र त्याला भेटण्यासाठी येतात. सर्व मुले हसत खिदळत असलेले पाहून गोदू आईला म्हणते, मी जाणार म्हणून माझ्या मैत्रिणी रडतात आणि हया मुलांना आपला मित्र जाणार म्हणून काहीच कसे वाटत नाही. तेव्हा गोदूची आई म्हणते हाच आपल्या बायकांच्यात व पुरूषांमध्ये फरक आहे. आपला मित्र जाणार म्हणून त्यांना त्याचे काही वाटत नाही. एक मित्र नाही तर

दुसरा मित्र, पण आपणा बायकाचे तसे नाही आपण फार मनाला लावून घेतो म्हणूनच बायका नवरा मेला तर जन्मभर रडत बसतात पण पुरूष मात्र दुसरे लग्न करून मोकळे होतात.

रत्नागिरीला गेल्यानंतर गोदूची प्रथम ओळख बाबीशेट या व्यक्तीशी होते ते सुधारणावादी व प्रगतीप्रिय होते. स्वभावाने अतिशय प्रेमळ होते. प्रत्येक गोष्ट गोदूला समजाऊन सांगत होते. गोदूच्या घराशेजारी डॉ. कीर्तिकर नावाचे गृहस्थ राहत होते. ते प्रार्थनासमाजनिष्ट होते. त्यांची हिंदू समाजरचने विषयीची भूमिका नवमतवाद्याची व नवविचारवंताची होती. त्याची मते प्रगमनशील व सुधारकी वळणाची असल्यामुळे त्यांच्या विचाराचा प्रभाव गोदूच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला दिसून येतो.

गोदू हायस्कूलमध्ये शिकायला जाते. तेव्हा गोदूला छबी व कमा नावाच्या दोन मैत्रीणी भेटतात. छबीच्या घरी गोदू वारंवार जाते. पण छबी गोदूला कधी पाणी सुध्दा विचारीत नाही याचा गोदूला राहून राहून प्रश्न पडतो. एके दिवशी गोदू छबीला पिण्यासाठी पाणी मागते. तेव्हा आमच्या भंडाऱ्याच्या घरचे पाणी चालेल का? असा प्रश्न छबी गोदूला करते. तरीही गोदू छबीने दिलेले पाणी पिते. यावरून गोदूच्या मनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही याची कल्पना येते. याशिवाय इतर जातीतील मुलीबद्दल गोदूला वाटणारी आस्था कळकळ व उदारमतवादीची साक्ष पडते.

घरच्या लोकांच्या जुन्या विचारसरणीमुळे छबीला आपले शिक्षण अर्धवट सोडून घरी बसणे जिवावर येते. मुलगी जास्त शिकली तर अनेक अडथळे निर्माण होतात. असा छबीच्या घरच्या लोकांचा समज होता. गोदू जेव्हा छबीला भेटायला जाते तेव्हा छबी आपले रडगाणे गोदू जवळ प्रकट करते. ''शिक्षणाला आड येणारं असं हे लग्न म्हणजे आहे तरी काय? मुलीचे लग्न हे

झालचं पाहिजे असा अट्टाहास का? पुरूष शिकतात विव्दान होतात. नोकऱ्या चाकऱ्या करतात. तसे बायकांनी का करू नये? लग्न झालं पाहिजे म्हणे! लग्नासाठी मुलीला शाळेतून काढून घरी ठेवायची हा कुठला न्याय?''[४] असे अनेक प्रश्न छबीला पडतात. यावर छबीच्या आईचे म्हणणे असे की बायकांच्या जातीला लग्नाशिवाय राहता येत नाही. ब्राह्मणांच्या मुलीचे तसे नाही. जरी त्या मुली जास्त शिकल्या तर त्यांना चांगला शिकलेला नवरा मिळणे सोपे जाते. पण खालच्या जातीतील मुलीचे तसे नाही जिथे पुरूषच शिकलेले नसतात तिथे बायकांच्या शिक्षणाला कोण विचारतो? एखादी मुलगी जास्त शिकली आणि तिचे लग्न झाले तर अर्धवट शिकलेल्या नवऱ्याला ती डोईजड होईल. शिकलेली बायको आपले ऐकणार नाही. आपलीच मनमानी करेल. आपल्या नवरेपणाच्या अधिकाराला धक्का बसेल असा त्यांच्या पुरूषी अहंकार सतत त्याला सांगत असतो. म्हणून पुरूष हे कधीही आपल्यापेक्षा जास्त शिकलेल्या मुलीशी सहसा लग्न करायला तयार होत नाहीत. छबीच्या आईला जरी आपली मुलगी खूप शिकावी बी.ए., एम.ए. व्हावी असे जरी वाटत होते. तरी सभोवतालच्या परिस्थितीमुळे ते शक्य नव्हते. कारण परंपरेने चालत आलेल्या रूढी परंपरांना छबीची आई विरोध करू शकत नाही.

छबीच्या आईचे बोलणे ऐकून लग्न म्हणजे काय? लग्नाचा आणि शिक्षणाचा संबंध जगण्यासाठी आहे की जगवण्यासाठी आहे? शिक्षणाच्यासाठी लग्न खर्ची घालावे की लग्नाच्यासाठी शिक्षणाला रामराम ठोकावा? लग्न झालेले पुरूष पुढे शिकतात पण लग्नानंतर शिक्षण घेण्याचा मुलीला का अधिकार असू नये? असे अनेक प्रश्न गोदूला पडतात.

मुलीला चांगल्या घरात द्यायचे असेल तर मुलीला शिक्षण दिले पाहिजे. म्हणून ब्राह्मण जातीतील लोक मुलीना

शिकवतात. तर खालच्या जातीतील लोक जास्त शिकलेल्या मुलीचे लग्न होणार नाही हया काळजीमुळे मुलींना शाळेतून काढतात. हा विरोधाभास कशामुळे निर्माण झाला? जातीजातीमध्ये असणारी ही बंधने कोणी निर्माण केली? शिक्षण ही मक्तेदारी फक्त उच्चवर्गीयांचीच का राहिली? हया प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गोदू आईकडे जाते. गोदूच्या आईच्या मते — जेव्हा आपलं लग्न झाले. तेव्हा आपणांस लग्न म्हणजे काय? हेच कळले नाही तर मी तुला काय सांगू असे गोदूच्या आईचे मत होते. पण लग्न हे मुलीच्या आयुष्यातील संकट आहे. लग्न होण्यापूर्वी ज्या मुली धिटुकल्या, धाडसी होत्या शब्दाला शब्द, उत्तराला उत्तर देण्याची ताकद ज्या मुलीमध्ये असते अशा मुलीही लग्नानंतर कमकुवत होतात. गोगलगाई सारख्या मऊ होतात. "सुनांचे जिणे मोठे केविलवाणे असते"[५] चांगली सून होण्यासाठी सर्वांनी सांगितलेले ऐकावे लागते. पण आपल्या मताला कोणीही विचारीत नाही. मन मारून राहावे लागते. स्वत:च्या बुध्दीची धकम दाखवण्याची संधीही मिळत नाही. दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी प्यायचे. मग ती सून सुशिक्षित असो की अशिक्षीत असो. तिला आपले मत मांडण्याचा अधिकार नसतो. म्हणूनच आपल्या जीवनातील दु:ख बायका मोकळेपणाने मांडत नाहीत. आपले दु:ख जर बायका बोलू लागल्या तर कोणतीही मुलगी लग्नासाठी तयार होणार नाही. म्हणून गोदूची आई गोदूला सांगते "गोदे, पोरी तू आपली शिकत जा चांगली विव्दान हो, चांगल्या परीक्षा दे, इतर आया पोरीच्या लग्नासाठी तळमळतात तशी तळमळणारी मी नाही. तुझ्या लग्नाची घाई मी करणार नाही. चांगली शीक, चांगली करतीसवरती हो, लग्न म्हणजे का, हे कळण्याइतकी बुध्दिमान हो. आणि लग्न करावं असं वाटलं तर नंतर मला सांग, जगले वाचले तर हा माझा निश्चय दांती धरून चालवीन पण मेलेच तर नशीब तुझं ! तशी मेले तर वडिलमाणसांच्या सक्तीसाठी

लग्नाला तयार होऊ नकोस अगदी दुराग्रह धर. तुला कुणी नावं ठेवली तरी हरकत नाही. पण लग्नाशिवाय जगता येत नाही असं वाटल्याशिवाय लग्नाला तयार होऊ नकोस''[६] लग्नाविषयीचे आपले मत गोदूची आई गोदू पुढे प्रकट करते. पुरूषांचे लग्नाविषयी मत काय असेल ? बाबा व बाबीशेट आपले खरे मत देतील का ? हा प्रश्न गोदूला पडतो.

मुलीचे लग्न होताना तिला लग्नामध्ये भांडी, दागिने, पलंग, बिछाने, गुलाबदाण्या देतात. काहीजण आयपत नसतानाही कर्ज काढून समाजाच्या भीतीने 'रीण काढून सण साजरा करतात' या म्हणीप्रमाणे लग्नामध्ये वस्तू देतात. परंतु या वस्तू पुरवण्याची ताकद सर्वांचीच असते असे नाही. म्हणूनच खालच्या जातीत चाळीस—पन्नास वर्षे वयाच्या कुमारिका आढळतात. मुलगी जन्माला आली की तिच्या लग्नाची काळजी तिच्या आईवडिलांना वाटते. ''ब्राह्मणाची मुलगी उपवर होण्यापूर्वी तिचं लग्न झालं पाहिजे, नाहीतर जात बुडते, असं तुम्ही म्हणता, पण आमची जात कुठं बुडाली नाही ती !'' [७] असे डॉ. कीर्तिकरांना वाटत होते.

लग्न म्हणजे करार आहे. या करारामध्ये एक पुरूष आणि एक स्त्री यांना एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे बंधन असते. दोघांनीही एकमेकांची फसवणूक करायची नाही. वरचढपणा करायचा नाही. समबुध्दी आणि समवृत्तीने संसार थाटायचा, देवाब्राह्मणांच्या साक्षीनं घेतलेल्या अटी पाळल्या जातात का? आपले हक्क काय? कर्तव्य काय? हयाची जाणीव स्त्रियांना नसते. म्हणूनच लहानपणापासूनच स्त्रियांना त्याची जाणीव करून दिली पाहिजे असे डॉ. कीर्तिकरांचे मत होते.

गोदूवर डॉ. कीर्तिकरांचा प्रभाव पडला होता. त्यामुळेच गोदू लग्नासारख्या विषयावर आपले मत मांडते. — ''लग्न म्हणजे एक करार आहे. असं एकदा गृहींत धरलं, म्हणजे हा करार

मोडण्याचा मार्ग कुठं तरी असला पाहिजे. तात्पर्य काय, की लग्न हा एक करार आहे. आणि तो करार करण्याच्या बाबतीत चांगलं सज्ञान झाल्याशिवाय आपल्या मुलामुलींना या करारात पाडू नये, खरे पाहिलं तर अज्ञान मुलांच्या हातून देवा ब्राहमणांच्या साक्षीनं का होईना, कोणताही करार करून घेणं बेकायदेशीर आहे. अज्ञान मुलांनी केलेला कोणताही करार लग्नाशिवाय इतर कोणताही करार — कायदेशीर समजला जात नाही. पण मनुस्मृतीच्या जोरावर आईबापांनी अज्ञान मुलाकरवी करून घेतलेला हा करार का पाळला जातो. याचंच मला आश्चर्य वाटतं''[८]

छबीचे लग्न करण्यासाठी तिला शाळेतून काढतात. पण अजून तिचे लग्न ठरले नाही. मात्र तिच्या भावाचे लग्न ठरते. लग्नाची सर्व तयारी होते. भंडारी जातीतील लोकांचे विशेष म्हणजे हे लोक मोठे मानी कोणत्याही बाबतीत आपला कमीपणा जगाच्या नजरेला येऊ द्यायचा नाही असे या जातीचे ब्रीद आहे. म्हणूनच म्हणतात 'भंडारी बायको देईल पण बढाई देणार नाही.' अशी म्हण प्रचलीत आई. छबीचे लग्न तिची आई पाटाची बायको आहे म्हणून मोडते. छबीच्या भावाच्या लग्नात छबीची आई पूजेला बसते. यावरून वाद निर्माण होतो. हे पाहून गोदूच्या आईला राग येतो. सर्व बंधने स्त्रियांच्या पावित्र्यासाठी आहेत, पावित्र्याचं बंधन पुरूषांना का न लावाव? स्त्री तेवढी पवित्र राहायची आणि पुरूषांनी मात्र मनसोक्त वागायचं हे का?

गोदूची आई शांत स्वभावाची होती. परंतु काही प्रसंगी ती आपला राग आवरू शकत नसे ''स्त्रियांवर होणारे असे धडधडीत अन्याय पाहिले की माझ्या सारख्या बाईला देखील ही आपली शास्त्र जाळून टाकावीत असे वाटू लागते.''[९] गोदूच्या आईने काढलेले वरील उद्‌गार स्त्री जातीच्या दृष्टीने प्रतिनिधीक वाटतात.

छबी व कमा ह्या दोघीचीही शिकण्याची इच्छा जबर होती. पण त्यांना तशी संधी मिळाली नाही. छबीला जर संधी मिळाली असती तर तिचाही पहिला नंबर आला असता असे गोदूला वाटत होते. तर कमा वयाने मोठी असल्यामुळे तिचे लग्न लवकर होणार हे निश्चित होते. यावरून गोदूला आपल्या मैत्रिणींविषयी वाटणारी आस्था दिसून येते.

रत्नागिरीला असताना गोदूची व बनीची भेट होते. बनीने मोठी अवजड साडी नेसली होती. अर्धा हात भरून हिरव्या बांगडया, गोट, पाटल्या, तोडे, गळयात ठुशी, वज्रटिका, कानात बाळया, बुगडया, डोईत रानटी चंद्रकोर अशा अवजड अलंकारानी बनी नटलेली पाहून गोदूला आश्चर्य वाटते. लग्न झाल्यानंतर मुलीच्या दिसण्यात बोलण्यात, वागण्यामध्ये किती बदल होतात हे वरेरकर यांनी दाखवले आहे.

लग्न झालेल्या मुलीमध्ये एवढा प्रचंड बदल का? व कसा होतो? या प्रश्नाची उत्तरे गोदू आईकडून समजून घेण्याचा प्रयत्न करते. गोदूचे लग्न न झाल्यामुळे ती असे प्रश्न विचारते. असे गोदूच्या आईचे मत होते. गोदूच्या आईचे लग्न झाले तेव्हा मी बनीपेक्षाही लहान होते असे गोदूची आई गोदूला सांगते. माणूस मेल्यावर जेवढया आक्रोशाने रडतात तेवढयाच आक्रोशाने मुलीला सासरी पाठवताना आई वडील रडतात. प्रथम सासरी जाताना तेथे कोणी ओळखीचे नसते म्हणून माहेरहून एक पाठराखीण पाठवतात. त्यामुळे माहेरच्या गप्पा मारता येत असल्या तरी थोडयाच दिवसांनी पुन्हा माहेरी आल्यानंतर दुसऱ्यांदा सासरी जाताना एकटीला जावे लागते. त्यावेळी परकेपणा जाणवतो. लग्नानंतर सासरी सर्वांशी बोलले तरी चालते पण ज्यांच्यामुळे हया नवीन माणसांशी नाती निर्माण झाली. ज्याला जीवनाचा जोडीदार मानला त्या नवऱ्याशी बोलणे तर दूर बघायचे सुध्दा नाही. नवऱ्याशी बोलले तर सर्वांच्या

चर्चेचा विषय बनतो. या भीतीपोटीच नवी नवरी आपल्या नवऱ्या बरोबर बोलायचे टाळते. पिढयानंपिढया चालत आलेले हेच संस्कार आई आपल्या मुलीलाही शिकवते. पण गोदूची आई हया सर्वांपेक्षा वेगळी होती.

लिमयेबुवा यांचा पेशा हरिदासाचा होता त्यांनी द्रौपदी वस्त्रहरणाच्या आख्यानांतून भीष्मद्रोणाच्या नेभळेपणामुळे भरसभेत द्रौपदीची कशी विटंबना झाली आणि त्यांनी द्रौपदीवर आपली कशी सत्ता दाखवली याचे वर्णन सांगितले. त्यावर गोदूची आई आख्यानावर बोलते. स्त्रियांच्या पारतंत्र्याला सुरूवात केव्हापासून झाली याची आपणांस कल्पना नव्हती. आज तो सुगावा लागला. आणि माझा संशय दूर झाला असे गोदूच्या आईला वाटते. म्हणूनच गोदूची आई भीष्मपितामहांवर आपला राग प्रकट करते. गोदूची आई जरी जुन्या पिढीतील होती. तरी तिने केलेला प्रचार बलवत्तर आहे. हे पाहून जुन्या काळांतील स्त्रीने नव्या स्त्रीवर केलेली मात आहे असे वाटते.

बनी आपल्या सासर विषयी सांगत असताना सर्वांचा उल्लेख करते. पण नवऱ्याचा कुठेच उल्लेख करत नाही. बनी वयाने लहान असूनही तिच्या चेहऱ्यावरून व तिच्या बोलण्यावरून बनी पोक्त वाटत होती. हे पाहून गोदूला आईची आठवण येते. बनी व गोदू गप्पा मारत असताना ठकी विषयी बोलतात तेव्हा ठकीच्या मनाविरूध्द तिच्या वडिलांनी तिचे लग्न एका तीस चाळीस वर्षाच्या मुलाशी करून दिले होते असे बनी गोदूला सांगते.

गोदू मॅट्रिकच्या परिक्षेत पहिली येते. आणि गोदूला जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळते. गोदूचे हे परिक्षेतील असामान्य यश पाहून तिची आई म्हणते — ''आमच्या काळात मुलीचं जिणचं मोठ वाईट होतं आज फारसा बदल झाला आहे असं नाही खरं, तरीपण माझ्यासारखी एखादी दुसरी निराशा झालेली आई

आपली मुलगी तरी नावारूपाला यावी म्हणून इच्छा धरू लागली आहे.'' [१०] या वाक्यातून गोदूच्या आईचे स्वत:चे दु:ख ती न बोलून दाखवताही जाणवते.

गोदू मुंबईच्या कॉलेजात जाण्यापूर्वी डॉ. कीर्तिकरांकडे निरोप घ्यायला जाते तेव्हा डॉ. कीर्तिकर भावपूर्ण अत्यंकरणाने गोदूला सांगतात ''मैत्रिणी जुळवताना डोळे चांगले उघडे ठेव, प्रत्येकाच्या अंत:करणात अगदी खोल पण वर्षानुवर्षे सहवासात राहिलीस तरी देखील एखाद्या माणसाचा स्वभाव कळायला तसाच प्रसंग यावा लागतो. त्यातून हे तर फुकटया तारवाचे तुकडे, क्षणभर जवळ यायचे आणि लगेच दूर व्हायचे.....''[११] असा मोलाचा सल्ला देतात. डॉ. कीर्तिकरांसारखे गृहस्थ ही हुंदके देऊन रडतात. तर बाबीशेटना आपल्या पोटचा गोळा दूर जातो आहे असे वाटते. हे पाहून पुरूषांच्या हृदयांत देखील मातृत्वाची भावना असते असा विचार गोदूच्या मनात येतो. मातृत्वाची भावना सर्वांच्यामध्ये असते. पण आपला पुरूषी अहंकार दुखावेल म्हणून पुरूष रडत नाहीत. आपणाला दु:ख झाले तर आपण रडलं पाहिजे केवळ लोकांच्या लाजेनं दु:खाचे आंवढे गिळून टाकले तर मन मरून जाते. आणि अंगी राक्षसी वृत्ती येईल. असे गोदूची आई गोदूला सांगते.

गोदूला पुण्यापेक्षा मुंबई अधिक स्वच्छ वाटते. पुण्याविषयी गोदूचे मत फारसे चांगले होत नाही. कारण पुण्यातील लोकांचे आदरतिथ्यांचे व सभ्यपणाचे वागणे गोदूला आवडत नाही. गोदू हॉस्टेलमध्ये दाखल झाल्यावर तेथे गोदूला जातीव्यवस्थेचा प्रकार पाहायला मिळतो. याचे सर्व लोक कशा प्रकारे समर्थन करतात याचे गोदूने चित्रण केलेले आहे. हॉस्टेलमध्ये येताच गोदूची मंजुळा चव्हाण नावाच्या मुलीशी ओळख होते. हॉस्टेलमध्ये जेवणासाठी ब्राहमणाखेरीज इतर जातीतील मुलींना बाजूला बसवित होते. हयाचा मंजुळाला राग येवून मंजुळा म्हणते. ''सर्वांच्या पंक्तीला ताट नसल

तर पोट काही उपाशी पडत नाही, आणि ब्राहमणांच्या पंक्तीला बसल्यानं अन्नाची चव काही बदलत नाही... आम्हाला मराठे म्हणून बाजूला बसवितात पण तुम्ही नाही का मराठे ?''[१२] असा प्रश्न मंजुळा करते.

मराठे ही जात का आहे ? मराठी बोलतात ते सारे मराठे. गोदूच्या हया बोलण्यावरूनच गोदूची व मंजुळेची मैत्री होते. गोदू आपल्या बंडखोरपणाची ओळख करून देताना मंजुळेला म्हणते — ''मंजुताई, मी एक बंडखोर मुलगी आहे. चिपळूण रत्नागिरीत माझी तशी ख्याती आहे. आणि इंथही माझा काहीतरी बंड करायचा विचार आहे. आज मी हे बंड पुकारणार''[१३] असे गोदू म्हणते आणि जेवणाच्या पंक्तीतून उठून गोदू बाजूला मंजुळा शेजारी जाऊन बसते. पंक्तीमध्ये गोदूने केलेल्या धाडसामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये चर्चेचा विषय होतो. आणि हा हा म्हणता ही बातमी हॉस्टेलमध्ये व कॉलेजात पसरते. मराठीण? आणि आडनाव गोखले कसं? असे गोदूला विचारताच माझं आडनांव गोखले आहे, आणि मी मराठीण आहे असं गोदू ठासून सांगते. गोखले मराठे कधी झाले? असा प्रश्न मुलींनी करताच, गोदू म्हणते — ''महाराष्ट्रात जन्म घेतला तेव्हापासून! महाराष्ट्र आपली मातृभूमी आहे, असं म्हणू लागले आणि मराठी भाषा बोलू लागले. तेव्हापासून!''[१४] गोदूच्या हया बोलण्यामुळे तिच्यामध्ये असणारा बाणेदारापणा व बंडखोरपणा आणि तत्पर बुध्दीची कल्पना येते. गोदूच्या हया वागणुकीमुळे विद्यार्थ्यांमध्ये गोदूची निंदा होऊ लागते.

रत्नागिरीचा नाना गोदूला पहिल्यापासून ओळखत असल्यामुळे गोदूची चेष्टा, टवाळी करण्यात अग्रसेर होता. गोदू कोणत्या जातीची आहे हे साक्षात ब्रहमदेवालाही सांगता येणार नाही. कारण त्या तेल्याच्या घरी जेवल्या आहेत, भंडाऱ्याच्या घरी पाणी प्यायल्या आहेत, आणि सुरती धेडाच्या हातचा चहा पिऊन पाठारे

प्रभूच्या घरी वाढल्या आहेत. नानाने गोदूवर केलेली ही टीका सर्वत्र वाऱ्यासारखी पसरते. तिच्या हया वागणूकीचा सर्व विद्यार्थी विरोध करतात. या सर्व प्रकरणामध्ये नानाचा हात आहे हे कळल्यानंतर गोदू नानाला जाब विचारते. आणि खडसावून नानाची कान उघडणी करते. आणि "आम्हा मुलीना तुम्ही काडीमुंगी म्हणून का समजता ? शेकडो मुलांच्या जोडीनं आम्ही कॉलेजात यायचे धाडस केलं आहे त्या अशा काडीमुंगीसारख्या चिरडल्या जाऊ, असं मुळीच समजू नका."[१५] अशा शब्दात नानाची कानउघडणी करते.

विरोधाने विरोध वाढत जाऊन गोदूच्या वर्तनाची वार्ता हळूहळू प्रिन्सिपॉल साहेबापर्यंत जाते. पुरूष व स्त्री विद्यार्थी वर्गामध्ये जो वाद झाला त्याच्या संघर्ष बीजाचे मूळ हे गोदूच्या स्वभावधर्मात आहे असे प्रिन्सिपॉल साहेबांना वाटल्यामुळे ते गोदूला म्हणतात — "मुली, मला वाटतं हा यशाचा कैफ तुला पचवता आला नाही. तुला अभिमान झाला आहे, तुला 'ग' ची बाधा झाली आहे. त्यामुळेच असले विचार तुझ्या डोक्यात येतात." [१६] हे ऐकून प्रिन्सिपॉलसाहेबांना उलट उत्तर देण्याचा विचार गोदूच्या मनात वांरवार येऊ लागतात पण मंजुळेने गोदूला आवरले, बायकांच्या जातीला सडेतोडपणा शोभत नाही. या तिच्या उद्‌गारांनी गोदूचे मस्तक भणभणू लागते. बायकांच्या जातीच्या नाशाला बायकाचं कारणीभूत आहेत. त्यामुळेच पुरूष मोकळे सुटले आहेत. आणि वाटेल तसे वागतात असे गोदूला वाटते. कॉलेजात शिकणाऱ्या मुलीच्या मध्ये गोदू वयाने सर्वात लहान होती. त्यामुळेच गोदू काहीही बोलली, कसेही वागले तरी सर्वजण गोदूला उर्मट समजत होते.

सुट्टीला गोदू रत्नागिरीला जाते. घरात लग्नाचा विषय निघाल्यानंतर गोदू वडिलांना विचारते. समवयाच्या मुलामुलीची लग्न का होत नाहीत? हया प्रश्नाचे काय उत्तर द्यायचे हे गोदूच्या

वडिलांना सुचत नाही. हे पाहून गोदूला आपण कोणीतरी आहोत असे वाटते. आपणाला सर्व गोष्टीचे ज्ञान असावे म्हणून गोदू गायन कला शिकते. डॉ. कीर्तिकरांच्या घरी जाऊन संस्कृत, वैद्यक, आयुर्वेदाविषयीची पुस्तके वाचते.

गोदू कॉलेजात होती त्यावेळी तिचे वय एकोणीस वर्षाचे होते. तेव्हाच्या काळी तिच्या वयाच्या दोन दोन मुलांच्या आया झालेल्या बायका होत्या. असे गोदू सांगते. गोदू पहिली येऊन तिला जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळते. तेव्हा गोदूच्या दादाला गोदूचा मत्सर वाटतो. लग्नाचा विषय निघतो त्यावेळी गोदू वडिलांना उलटून बोलते. याचा फायदा घेऊन गोदूचा दादा गोदूचा पाणउतारा करतो. तू एक बायको माणूस आहेस — माझी बहीण आहेस — याची आठवण तुला नसली तरी मला आहे. अशी कटवट भाषा वापरतो.

गोदू मुंबईला जाऊन विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेते. तेथे तिला एके दिवशी राजारामशास्त्री भागवत यांची अचानक गाठ पडते. ते गोदूला गिरगांव नाक्यावर असणाऱ्या एका इराण्यांच्या दुकानांत घेऊन जातात हे पाहून गोदूला आश्चर्य वाटते. राजारामशास्त्री प्रार्थना समाजात जात असले तरी त्यांना त्या समाजातील सर्वच व्यक्तीबद्दल फारसा आदर नव्हता. कारण त्या व्यक्तीच्यामध्ये दांभिक माणसांचा भरणा फार आहे असे त्यांचे म्हणणे होते.

आपण सुंदर आहोत याची जाणीव गोदूला नव्हती. पण गौरीने ती करून दिल्यामुळे गोदूच्या नजरेसमोर नवी सुष्टी उभी राहते. नाना चितळे याने लिहलेल्या एका कवितेवरून नाना व गोदूचे प्रेम असावे असे सर्व विद्यार्थीना वाटते. म्हणून वर्गातील बाकावर दोघांचीही नावे लिहली जातात. नाना गोदूवर असणारे प्रेम प्रकट

करतो. हे पाहून गोदूला आपल्याजवळ बुध्दीखेरीज सौदर्य हा गुण आहे या भावनेने गोदू हरळून जाते.

छबू भंडारी हिचे लग्न कशाप्रकारे ठरते व त्यामुळे तिला त्याचा किती त्रास सहन करावा लागणार आहे हे तिच्याच तोंडून ऐकल्यानंतर लग्न विधीविषयीचा गोदूचा तिटकारा वाढतो "लग्न! लग्न!! लग्न!! लग्नशिवाय मुलीच्या जातीला गत्यंतरच नाही का ? परिस्थितीने असो, पदवीने असो किंवा श्रीमंतीने असो मूलीशी तुलना करता नवऱ्या मुलाचा वरचष्माच राहिला पाहिजे हा नियम केव्हापासून आमलात आला ?" [१७] हया प्रश्नाने गोदूच्या मनात विचारांचे काहूर माजू लागते.

नाना गोदूच्या नकळत गोदूच्या लग्नाविषयी विचारपूस करू लागतो. पण लग्नाविषयी गोदूचे विचार जहाल होते. नानाला गोदू सडेतोड उत्तर देते. गोदूच्या मते – "हिंदू मुलगी जोपर्यंत अविवाहीत आहे तोपर्यंतच तिला स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्याची किंमत मला जगण्यापेक्षा जास्त वाटते. हिंदुत्वामुळे उत्पन्न होणारे गुलामापेक्षाही निकृष्ट स्थितीचे पारतंत्र्य मला नको आहे. मला लग्न करायचं नाही, ते इतर मुली म्हणतात त्याप्रमाणे नव्हे, मी लग्न या विषयावर सांगोपांग विचार केला आहे. आणि त्या विचाराचं फळ म्हणूनच मी लग्न कारणार नाही." [१८] असे गोदूला वाटते.

गोदूच्या हया भाषणाने नाना हवालदील होतो. व 'मी कुणीतरी आहे.' हा गोदूला असणारा अभिमान पुन्हा जागृत होतो. गोदूच्या दादाचे लग्न होते. गोदूचेही लग्न उरकून टाकावे असे गोदूचे बाबा म्हणताच, वाटेवरच्या चोराचा हात धरून घराबाहेरजाण्याची माझी इच्छा नाही. असे गोदू वडिलांना उलटून बोलते. याचा गोदूच्या वडिलांना राग येतो. गोदूचे मन वळवण्यासाठी देवच वरून अवतरला पाहिजे असे गोदूच्या बाबांना वाटत होते. लग्नाच्या विषयावरून गोदूचे व तिच्या वडिलांचे जोराचे भांडण होते. याचवेळी

गोदूच्या परीक्षेचा निकाल लागतो. गोदू पहिल्या वर्गात पास होते. पण वडिलांशी भांडण झाल्यामुळे गोदूचा पुढील शिक्षणाचा मार्ग बंद होतो. त्याच दरम्यान गोदू शिरीन पाठक नावाच्या मैत्रिणीजवळ राहू लागते. याचवेळी नाना व गोदूमध्ये सख्य वाढत जाऊन नाना गोदूला लग्नाविषयी विचारतो. त्यावेळी गोदू लग्नाविषयी आपले मत मांडते — तुम्ही लोक या विषयाला धार्मिक किंवा आध्यात्मिक स्वरूप देता. मला त्यात धर्म दिसत नाही किंवा आध्यात्मिकताही दिसत नाही. लग्न हा एक उघडउघड व्यवहार आहे. असे गोदूचे मत होते. येथे गोदूची स्त्रीवादी भूमिका दिसून येते.

गोदू भावना प्रधान नव्हती. त्यामुळे नानाच्या भूलथापांना ती बळी पडली नाही. प्रेमाचे कसलेही भारूड तिचे मन वळवू शकत नव्हते. त्यामुळे ती नानाला आपल्या स्वभावाची स्पष्टपणे कल्पना देताना म्हणते, ''मी संटिमेंटल नाही, कोणत्याही भावनेनं माझं मन वाहवत जाऊ नये. अशी मी खबरदारी घेत असते.'' [१९] आपल्या मनात आलेले विचार व्यक्त करण्याचे धाडस गोदू जवळ आहे. नाना गोदूला ठामपणे आपले मत सांगते पण म्हणतात ना देवाची काही औरच मर्जी होती.

ठकू तेली व बनी गोडबोले हया दोघींच्या वैवाहिक जीवनामध्ये झालेल्या घटनावरून गोदू व नाना मधील वाद चिघळला जातो. त्यामुळे नानाच्या सहवासात राहणे. नानाने मिळवलेले अन्न खाणे याचे गोदूला वाईट वाटते. आपणही इतर पांढरपेशा बायकांप्रमाणेच आहोत ही कल्पनाच गोदूला दु:सह वाटत होती. आपण नानाची कोण आहोत? त्याच्या मुलीची आई? नानाची दासी ? नानाची रखेली? की विवाहीत रखेली? असे विचारचक्र गोदूच्या डोक्यात सुरू होते.

'गोदू गोखले' हया कादंबरीमध्ये वरेरकरांनी पुरूषप्रधान संस्कृतीचा एकतर्फीपणा दाखवून स्त्रियांच्या मनाची होणारी कुचंबणा

सार्थपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'गोदू गोखले' हया कादंबरीमध्ये वरेरकर यांनी समाजातील निरनिराळया जातीतील व्यक्ती व भिन्न मनोवृत्ती असणाऱ्या व्यक्तीच्या मानवी जीवनाचे व स्वभावाचे चित्रण केलेले आहे. गोदूच्या वडिलांपेक्षा गोदूच्या आईचा गोदूच्या जीवनावर परिणाम झालेला होता. गोदूची आई गोदूप्रमाणे चौकस होती. पण पुढे गोदूच्या आईचा चौकसपणा टिकला नाही. ही गोदूच्या आईची वृत्ती गोदूत उतरलेली होती. कोणतीही गोष्ट किंवा घटना पाहताना गोदूची आई जागृत व जागरूक राहते. परंतु परिस्थितीमुळे गोदूच्या आईला आपले मन मारावे लागते. आपली श्रध्दा नसतानाही गोदूची आई व्रतवैकल्य, दानधर्म करते, फक्त लौकिक व पुराणिकांची तोंड बंद ठेवण्यासाठी. गोदूची आई आपल्या स्वत:च्याच मनाविरूध्द वागते. याचं कारण तिला सांगता येत नाही. पण सुखी संसार करायचा म्हणजे तडजोड ही करावी लागते. असे गोदूच्या आईचे म्हणणे होते. आपणाला झालेला त्रास आणि जो कोंडमारा आपला झाला तो आपल्या मुलीचा होऊ नये असे गोदूच्या आईला वाटत होते.

समाजामध्ये असणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करत असताना गोदूला तिच्या आईची खूप मोठी मदत होते. आईच्या बोलण्यामुळेच गोदूच्या मनातील भेदाभेदाची वृत्ती मावळू लागली. गोदू जातीभेद पाळत नसल्यामुळे तिच्या विषयी गावात चर्चा होत होती. त्यामुळे गावातील स्त्रिया तिच्या आईकडे तक्रार करीत होत्या. यावर गोदूची आई म्हणते — ''सारं चिपळूण माझ्या मुलीबद्दल बोलण्याइतकी माझी मुलगी ती काय आणि तिच्याबद्दल सारे चिपळूण बोलत सुटलं आहे ते काय?''[२०] असे गोदूच्या आईचे मत होते. आपणाला ज्या प्रश्नांची उत्तरे शोधता आली नाहीत त्या प्रश्नांची उत्तरे शोधायला गोदूची आई गोदूला मदत करत होती. आम्ही बायका जन्माच्या दु:खी राहिलो तशी तू राहू नकोस. असे

गोदूची आई गोदूला सांगते. आणि गोदूला उघडया डोळयांनी जगाकडे पहावयास शिकवते.

'गोदू गोखले' हया कादंबरीमध्ये मामा वरेरकर यांनी तेली, वाणी, भंडारी, पाठारे, प्रभू, ब्राह्मण या जातीतील विवाहविषयक रीतिरिवाजांची माहिती तर दिलीच पण हुडयांसारख्या अनिष्ठ प्रथेमुळे लग्न संस्थेवर त्याचे होणारे दुष्परिणाम ही दाखवून दिले आहेत. वरेरकर यांनी आपल्या कादंबऱ्यामध्ये ब्राह्मणापासून ते अस्पृश्यापर्यंत सर्वांमध्ये एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

हिंदू समाजात अठरा पगड जाती, या जातीभेदामुळे समाज पोखरला जातो. जातीत पोटजाती यामुळे हिंदू समाजात ऐक्याची भावना आढळत नाही. गोदूने जातिव्यवस्थेचे सूक्ष्म संकलन केलेले असल्यामुळे विवाहपध्दतीचे निरीक्षण करून विषमविवाहाचे दोन प्रकार दाखविले. पहिला म्हणजे बनी गोडबोले हिच्या वडिलांनी आपल्या मुलीपेक्षा चार दोन वर्षानी मोठया असणाऱ्या मुलीशी लग्न केले होते. आणि दुसरे म्हणजे गोदूची मैत्रिण ठकी हिचा नवरा हा तिच्यापेक्षा वयानी खूपच मोठा होता. मामा वरेरकर यांनी जरठबाला विवाह, विषमविवाह याचा ही आपल्या कादंबऱ्यामध्ये परामर्ष घेतला आहे. यातून मामा वरेरकरांनी व्यक्तीचा व समाजाचा दोष दाखविला आहे. समाजातील विषमविवाहावर मामा वरेरकर यांनी टीका केली आहे.

'गोदू गोखले' हया कादंबरीची नायिका गोदू ही समाजाचे प्रतिनिधी व प्रतीक आहे. स्त्रियांच्या हक्कांना न्याय देण्यासाठी वरेरकरांनी ही पात्र योजना केली. स्त्रियांवर झालेल्या परंपरागत अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मामा वरेरकरांनी 'गोदू' सारखी आक्रमक व चौकस बुध्दिवादी नायिका घडविली. 'गोदू गोखले' ही पुरोगामी विचारांची होती. तिचा बंडखोरपणा व क्रांतिकारकपणा तिच्या बुध्दिवादी मनोवृत्तीतून आलेला होता. गोदूची बुध्दी

असामान्य होती. प्रखर बुध्दिमत्तेमुळे गोदू चौकस बनते. श्रध्देपेक्षा डोळसपणे जगाकडे पाहत होती. गोदूच्या बंडखोरपणाचे स्वरूप दुहेरी होते. एकतर तिने समाजातील दांभिकतेचा व शिष्टाचाराचा भ्रमनिरास केला आहे. व दुसरे म्हणजे समाजामध्ये असणाऱ्या मूलभूत व महत्त्वाच्या विचारप्रणालीच्या एकांगीपणावर होणारा अन्याय दाखविला आहे. 'गोदू' आचार व विचारप्रणाली विरूध्द बंड करते. उच्चनीच्चपणाचा दोष दूर करताना 'गोदू' लोकांना धडा शिकवावा म्हणून नागू तेल्याच्या घाण्यावर जाऊन खोबऱ्याची पेंड खाते, छबू भंडाऱ्याच्या घरी जाऊन लाडू खाऊन पाणी पिते. यामुळे गोदू समाजामध्ये असणाऱ्या प्रखर कल्पनांचा निषेध करते. परंतु त्यावेळची परिस्थिती विचारात घेता गोदूचा हा समाज शिक्षणाचा अभिनव प्रयोग होता असे वाटते.

गोदूने चालीरीतीवर टीका केली. उच्च वर्गीयातील व्दितीय विवाहाला पाटाचे लग्न का म्हणू नये ? मुलाप्रमाणे मुलीचीही मंजु का होऊ नये? माणसाने काळाप्रमाणे का बदलू नये? जुनेच रीतीरीवाज नवीन पिढीने ही पाळलेच पाहिजेत असा दुराग्रह का? कायद्यात बदल झाले तरी स्त्रियांना त्यांचे हक्क का मिळू नयेत? मुलीच्या जीवनात महत्त्व कशाला लग्न की शिक्षणाला? शिकलेल्या मुलाला न शिकलेली मुलगी चालते, तर शिकलेल्या मुलीला न शिकलेला मुलगा का चालू नये ? लग्नामुळे स्त्रियांची सर्वांगीण सुधारणा होते का? लग्न म्हणजे काय? लग्नाचा आणि शिक्षणाचा संबंध जगण्यासाठी आहे की जगवण्यासाठी आहे? शिक्षणाच्यासाठी लग्न खर्ची घालावे की लग्नाच्यासाठी शिक्षणाला रामराम ठोकावा लग्न झालेले पुरूष पुढे शिकतात पण लग्नानंतर शिक्षण घेण्याचा मुलीला का अधिकार असू नये? असे अनेक प्रश्न गोदूला पडतात.

'गोदू गोखले' ही कादंबरी घटनानिष्ठ आहे. ह्या कादंबरीच्या पूर्वार्धामध्ये गोदूची असामान्य, बुध्दिमत्ता, तिचा चौकसपणा, तिचे तत्त्व, तिच्या मनात निर्माण होणारी जिज्ञासा त्यामधून वरेरकर यांनी कथेची निर्मिती केलेली असून, स्त्रियांच्या जीवनात होणाऱ्या विविध घटनांचा समावेश केला आहे. स्त्रियांचा होणारा कोंडमारा व पुरूषांनी स्त्रियांची केलेली गळचेपी हा वरेरकर यांच्या कादंबरीचा प्रमुख विषय आहे. हिंदूच्या जातिव्यवस्थेतील लग्नसंस्थेचा वरेरकर यांनी आपल्या कादंबऱ्यामध्ये समावेश करीत असताना त्यातील विविधपणा व स्त्रियांवर होणारे अन्याय याचा परामर्श घेतला आहे. समाजातील वेगवेगळया जातीतील लोकांचे आचार विचार दाखवून वरेरकर यांनी महाराष्ट्रातील समानता आणि विषमता दाखवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

[illegible] गोदूची देवावर श्रध्दा नाही. तिचा दृष्टिकोन वस्तुनिष्ठ व पुरोगामी आहे. आजच्या युगातील प्रत्येक प्रश्नांची चिकित्सा करताना गोदू दिसते.

'गोदू गोखले' ह्या कादंबरीचे स्वरूप प्रश्ननिष्ठ आहे. ह्या कादंबरीमध्ये वरेरकरांचा स्वत:चा असणारा सामाजिक दृष्टिकोन गोदूच्या चित्रणातून प्रकट होताना दिसतो. गोदूच्या भूमिकेतून वरेरकर डोकावताना दिसतात. स्त्रियांचे असणारे मूलभूत हक्क आणि त्या हक्काचा पुरस्कार करणे ही वरेरकर यांच्या लेखनाची मूलभूत प्रेरणा होती असे दिसून येते. स्त्रियांना मिळणाऱ्या न्याय हक्कांची मूठमाती होतें. यामुळेच भारतीय स्त्रियांच्या जीवनात एक प्रकारची अपराधी भावना निर्माण होते. यावर वरेरकर यांनी आवाज उठवला आहे. महात्मा फुले यांच्या काळात 'स्त्री' शिक्षणाचे परिणाम होऊन समाज

सुधारणावादी दृष्टी वाढीस लागून समाज बदलू पाहत होता. याचा परिणाम न कळत का होईना लेखकांवर पडून त्यांनी आपल्या कादंबऱ्यामधून हा विचार मांडला आहे. म्हणूनच मामा वरेरकर यांच्या आधी ज्या लेखकांनी कादंबऱ्या लिहिल्या त्यांनी सुध्दा आपल्या कादंबऱ्यांतून हीच भूमिका वाढीस लावली 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी!', 'मुलगी झाली हो' यातून येणारी परंपरागत भावना भारतातील व महाराष्ट्रातील स्त्रियांच्या मनात रूजली गेली. या भावनेच्या कोषात गुरफटून न राहता हा कोष फोडून वरेरकारांची नायिका आक्रमक होताना दिसते. गोदूच्या स्वभावात अतिरंजन व अतिशयोक्ती हे दोष दिसून येतात. तिच्या अतिरेकी व एकांगी टोकाच्या विचारांची व एककल्ली हेकट मनोवृत्तीची सीमारेषा ओलांडताना गोदू उत्तरार्धात दिसून येते.

'गोदू गोखले' ही कादंबरी म्हणजे गोदूचे आत्मवृत्तच आहे. गोदूच्या स्वभावातील बाल, तरूण व प्रौढ मनाचा स्वतंत्र अविष्कार वरेरकरांनी दाखवला आहे. लहानपणी असामान्य बुध्दिमत्ता असणाऱ्या गोदूच्या व्यक्तिमत्त्वाची एक नवीनच बाजू उत्तरार्धात प्रकाशात येताना दिसते. गोदू व नाना यांच्या जीवनात निर्माण होणारा तणाव हेच उत्तरार्धाचे प्रमुख कथासूत्र आहे. गोदू सारखी बुध्दिमान विचारांची पक्की असणारी मुलगी विवाहाला योग्य ठरत नाही. हेच मामा वरेरकरांनी या कादंबरीतून दाखवले आहे. नाव बदलल्यामुळे गोदू व नाना या दोघांतील वैचारिक संघर्ष तीव्र होताना दिसतो. नवरा–बायको हे दोघे एकमेकांचे प्रतिस्पर्धी न होता त्यांनी एकमेकांना पूरक जीवन जगले पाहिजे. संसार सुखाचा होण्यासाठी दोघांनीही थोडं नमतं घेण्याची आवश्यकता असते. पण नेमका याचाच गोदू व नाना यांच्या संसारात अभाव होता असे दिसते.

गोदू ही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारी मुलगी असल्यामुळे एकाने कमवायचे व दुसऱ्याने बसून खायचे हे तत्त्व

गोदूला मान्य नाही. अशा प्रकारच्या आर्थिक व सामाजिक समस्या वरेरकरांनी 'गोदू गोखले' कादंबरीतून हाताळल्या आहेत. स्त्रियांनी लग्नानंतर नाव बदलावे का? लग्नानंतर पती चांगला मिळवता असता तरी पत्नीने नोकरी करावी का? लग्नानंतरचे चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र स्त्रियांचे असावे का? सामाजिक व सांस्कृतिक जीवनात पुरूषांच्या बरोबरीनं स्त्रियांना समानता कितपत असावी? या समानतेचे व्यावहारिक स्वरूप कोणते असावे?

गोदूच्या विवाह जीवनाशी वरील प्रश्न निगडीत आहेत. म्हणून त्याचे महत्त्वही कादंबरीपुरते निर्विवाद ठेवावे का? गोदू या जागृत व नव्या विचारांच्या स्त्रीच्याव्द्ारे वरेरकरांनी सद्यकालीन स्त्री जीवनावर विदारक प्रकाश टाकला आहे. नव्या आर्थिक व सामाजिक मूल्यांचा सर्वव्यापी प्रसार झाल्यामुळे आपली आजची जीवनमूल्ये बदलून गेली आहेत. सामाजिक मूल्यांमुळे डबघाईला आलेली आहेत. विवाहसंस्थेसारख्या जीवनाच्या एका महत्त्वपूर्ण क्षेत्रांत नव्या वैचारिक लाटेचा झपाटयाने प्रसार होत असल्यामुळे जुनी विचार व्यवस्था कोलमडून पडत आहे.

या कादंबरीच्या अनुषंगाने त्याकाळी व आजही विचारमंथन सुरू आहे. परिस्थितीच्या नव्या नव्या वळणांनी कुटुंब जीवनाला हादरे बसत असले तरी गृहस्थाश्रम व कुटुंबजीवन या दोन्हीही महत्त्वाच्या क्षेत्रात स्वत:चे समायोजन करून घेणे आवश्यक आहे.

. त्याच्या अनुषंगाने विवाह व कुटुंबसंस्था यासंबंधीच्या प्रश्नांचे प्रकटन झाले आहे. मध्यममार्गी भूमिका विचारवंत स्त्रियांनी एकीकडे स्वीकारली आहे. तर दुसरीकडे स्त्रीवादी दृष्टीकोनातून हा विषय चर्चिला जाऊन त्यांचे निष्कर्ष काढले जात आहेत.

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. आणि दुसऱ्याचे पारतंत्र्य विशुध्द मनाने पाहणारे मानवी मन मग ते स्त्रीचे असो किंवा पुरूषाचे असो माणूसपणाच्या काही मर्यादा स्वत:ला घालून घ्याव्या लागतील. प्रकाश यात्रेचा प्रवास पाहणारी स्त्री—पुरूषांची जत्रा चालत राहीली तरी हा प्रश्न सुटणार नाही. तर हा प्रश्न परस्परांच्या सहकार्याने सुटेल. आणि एकजिनसी जीवन जगावयाचे असा निष्कर्ष मनात येतो.

स्त्री—पुरूषांच्या समतेचा पुरस्कार मोठया हिरिरीने मामा वरेरकरांनी 'गोदू गोखले' या कादंबरीत केला आहे. आणि त्याच्या अनुषंगाने विवाह व कुटुंबसंस्था यासंबंधीच्या प्रश्नाचे प्रकटन झाले आहे. 'गोदू गोखले' च्या आईचा झालेला कोंडमारा गोदू आणि गोदूचा भाऊ यांच्यातील वृत्तीभेद यासारख्या उदाहरणांतून स्त्री व पुरूष यांच्या भिन्न वृत्तींची जोपासना कुटुंबातच कशी होत असते हे मामा वरेरकरांनी दाखवले आहे. तर गोदू आणि नानाच्या विवाहानंतर

स्वत:ची प्रतिष्ठा जोपासण्यासाठी नाना गोदूला नोकरी करण्यासाठी मान्यता देत नाही. त्यामधून पुरूषी अहंकाराचे दर्शन घडते.

पूर्वार्धामध्ये गोदूच्या लहानपणी घडलेल्या गोष्टी सांगितल्या आहेत आणि उत्तरार्धात गोदूच्या कॉलेजमधील जीवनाचा अनुभव चित्रित केला आहे. त्यामधून पुरूषी अहंकाराचे दर्शन वरेरकरांनी घडवले आहे.

स्त्रियांचे स्वातंत्र्य व समान हक्क याचाच विचार केला तर मामा वरेरकरांच्या सर्व नायिकात 'गोदू गोखले' ही मामा वरेरकरांची सर्वात बंडखोर मानसकन्या ठरते. मामा वरेरकरांनी आपल्या भोवतीच्या समाज जीवनाविषयीची दृष्टी 'गोदू' च्या रूपाने व्यक्त केलेली आहे. स्त्रियांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असावे, आपल्या पतीची — छाया असे दुय्यम स्थान असून नये तर स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव मिळावा. स्त्री—पुरूष हक्कांमध्ये विषमता असू नये. असे मामा वरेरकरांना वाटत होते. तर समाजातील कुटुंब व्यवस्था, विवाहपध्दती या सर्वांवर मामा वरेरकरांनी आपल्या लेखनातून हल्ला चढविलेला दिसतो.

मामा वरेरकरांचे विचार समजून घेण्यासाठी आणि कादंबरीकार म्हणून मामा वरेरकरांचे स्थान निर्विवाद करताना 'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' हया दोन कादंबऱ्या महत्त्वाच्या ठरतात. या प्रकरणातील निकर्ष खालील प्रमाणे —

(१) मामा वरेरकरांनी 'गोदू गोखले' हया कादंबरीमध्ये स्त्री—पुरूषांच्या समतेचा पुरस्कार केला आहे. 'गोदू गोखले' च्या जीवनकथेच्या ओघात जातीभेद, समाजातील आर्थिक श्रेष्ठ—कनिष्ठता, स्त्री— विषयक पारंपारिक कल्पना आणि त्या संदर्भातील गोदूचे वेगळेपण या सर्व कारणामुळे गोदूकडे पाहण्याची समाजाची दृष्टी कशा प्रकारची होती याची कल्पना येते.

(२) गोदू प्रमाणेच गोदूच्या मैत्रिणीच्या जीवनकथा 'गोदू गोखले' हया कादंबरीत आल्या आहेत. ब्राह्मणेत्तर जातीच्या

जीवनपध्दतीचे काहीसे वर्णन 'गोदू गोखले' या कादंबरीमध्ये आले आहे. हिंदू समाजातील तथाकथित उच्चवर्णीय पांढरपेशा स्त्रियांचे जीवन इतर स्त्रियांपेक्षा कसे अधिक गुलामगिरीचे आहे हे वरेकरांनी दाखविले आहे. पुरोगामित्वाची खरी शक्ती ही 'स्त्री' आहे. हे वरेरकरांनी 'गोदू गोखले' हया कादंबरीमधून दाखवून दिले आहे.

# संदर्भ सूची


१. वरेरकर भा. वि. (गोदू गोखले — पूर्वाध) प्रकाशक — न. रा. जोशी.मुंबई, मौज प्रिंटींग ब्युरो, पृष्ठ क्रमांक — ३४

२. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ३५

३. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ३५

४. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १६१

५. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १६३

६. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १६३—१६४

७. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १६८

८. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १७२

९. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १८०

१०. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) २

११. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) ५

१२. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) १२

१३. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) १४

१४. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) १५

१५. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) २४

१६. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) २९

१७. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) ४९

१८. पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) ९२

१९. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) १२१

२०. तत्रैव पृष्ठ क्रमांक — (उत्तरार्ध) ८६